ePaper
| वर्ष - 6 । अंक - 85 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | । गुरुवार । दिनांक 30 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# उद्धव ठाकरेंनी राजीनामा देताच फडणवीसांनी मानले एकनाथ शिंदेंचे आभार!




## आतील पानांत

- महाविकास आघाडीच्या नावाखाली पुणे जिल्ह्यातून शिवसेना संपवण्याचे कारस्थान
- मतदार याद्यांमध्ये राजकीय हस्तक्षेप!
- मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा राजीनामा




"मरता क्या न करता, सत्ता जात असताना त्यांना संभाजी महाराजांची आठवण आली. २५-३० वर्षांपूर्वी केलेली घोषणा त्यांनी केवळ निवडणुकीचा मुद्दा बनवला होता. आता आपली खुर्ची जात असताना त्यांनी हा निर्णय घेतला. मी शिवसेनेला सांगू इच्छितो की इतिहास बदलला जाऊ शकत नाही, नावं बदलली जाऊ शकतात, तुमच्याकडे दाखवायला काहीच नाही, त्यामुळे तुम्ही हा निर्णय घेतला. औरंगाबादची जनता ठरवेल औरंगाबादचं नाव काय असायला हवं किंवा नको,"

**-इम्तियाज जलील,** एमआयएम खासदार

शिवसेनेतील एकनाथ शिंदे तसेच जवळपास ४० आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. मी शरद पवार यांचे आभार मानतो. त्यांनी शिवसेना प्रमुखांच्या मुलास सांभाळून घेतले. मार्गदर्शन केलं. स्वतःचे लोक दगाबाजी करत असताना शरद पवार उद्धवजींच्या मागे ठामपणे उभे राहिले. काँग्रेस नेत्यांनी देखील सदैव समन्वयाची भूमिका घेतली. सत्ता येते सत्ता जाते. अमरपट्टा घेऊन कोणीच आलेले नाही!

**-संजय राऊत,** शिवसेना



## शॉर्ट न्यूज »

### महिलांचा संघर्ष अजूनही संपलेला नाही – मुक्ता बर्वे

**चिंचवड ।** एकविसाव्या शतकातही महिलांचा संघर्ष संपलेला नाही, अशी खंत प्रसिद्ध अभिनेत्री मुक्ता बर्वे यांनी चिंचवड येथे बोलताना व्यक्त केली. स्त्री भ्रूण हत्या ही समस्या केवळ ग्रामीण भागाची राहिलेली नसून त्याचे लोण शहरातील उच्चशिक्षित कुटुंबांमध्येही पसरले आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

गांधीपेठ तालीम मंडळाच्या वतीने चिंचवड 'एल्प्रो मॉल' येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. मंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ गोलांडे, जिजाऊ व्याख्यानमाला समितीच्या मेधा खुळे, गीतल गोलांडे आदी उपस्थित होते.

### खासदार श्रीरंग बारणे यांची पालिका आयुक्त राजेश पाटील यांचे वेधले लक्ष

# पिंपरी पालिका निवडणुकीतील मतदार याद्यांमध्ये घोळ!

## दीड ते अडीच हजार नावे मूळ प्रभागांकडून दुसरीकडे

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।**

आगामी महापालिका निवडणुकांसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार याद्यांमध्ये उघडपणे राजकीय हस्तक्षेप होत असल्याचा आरोप भाजप आमदार उमा खापरे यांनी केला असतानाच, शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांनीही मतदार याद्यांमधील घोळ समोर आणले आहेत. प्रत्येक प्रभागातील दीड ते अडीच हजार नावे मूळ प्रभागांमध्ये नसून दुसरीकडे जोडली गेली आहेत,



याकडे बारणे यांनी पालिका आयुक्त राजेश पाटील यांचे लक्ष वेधले आहे.

पालिका निवडणुकीसाठी केलेली प्रभागरचना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अनुकूल झाली असल्याची ओरड सुरूवातीपासून होत आहे. त्यातच मतदार याद्यांमध्ये राजकीय हस्तक्षेप झाल्याची आणि अधिकाऱ्यांनी पक्षपातीपणे कारभार केल्याची तक्रार भाजपकडून आमदार खापरे यांनी आयुक्तांकडे केली आहे. त्यापाठोपाठ, खासदार बारणे यांनी आयुक्तांना एक पत्र पाठवून मतदार याद्यांमधील चुका लक्षात आणून दिल्या आहेत.

निवडणुकीसाठी प्रभागानुसार फोडण्यात आलेल्या मतदार याद्यांची विभागणी प्रभाग रचनेला अनुसरून झालेली नाही. एकीकडील नावे दुसऱ्या प्रभागांमध्ये समाविष्ट झालेली आहेत.

जवळपास सर्वच प्रभागांमधील दीड ते अडीच हजार नावे मूळ प्रभागांमध्ये नाहीत, ती नावे दुसऱ्या प्रभागांमध्ये जोडण्यात आल्याचे दिसून येत आहेत, असे बारणे यांनी म्हटले आहे. तसेच, मतदार यादीतील नावे शोधण्यासाठी दिलेला अवधी खूपच कमी आहे. निवडणूक शाखेने २३ जूनला प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या. त्यावर हरकती व सूचना दाखल करण्यासाठी १ जुलैपर्यंत मुदत दिली आहे.

### आणखी 15 दिवसांची मुदतवाढ मिळवून घ्यावी

प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या ९ जुलैला प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. मतदार याद्यांवर हरकती आणि सूचना दाखल करण्यासाठी देण्यात आलेला ८ दिवसांचा कालावधी खूप कमी आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाला विनंती करून आणखी १५ दिवसांची मुदतवाढ मिळवून घ्यावी, अशी सूचना बारणे यांनी आयुक्तांना केली आहे.

### मेजर ध्यानचंद हॉकी पॉलिग्रास स्टेडियम येथे 6 देशांची आंतरराष्ट्रीय ज्युनिअर हॉकी स्पर्धा

# पिंपरीत आंतरराष्ट्रीय हॉकी स्पर्धांचे आयोजन

## पालिकेकडून 11 कोटी रुपये खर्चास मान्यता

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।**

पिंपरी महापालिका तसेच फेडरेशन ऑफ इंटरनॅशनल हॉकी यांच्या मान्यतेने आणि हॉकी इंडिया व हॉकी महाराष्ट्र यांच्या सहकार्याने पिंपरीतील मेजर ध्यानचंद हॉकी पॉलिग्रास स्टेडियम येथे ६ देशांची आंतरराष्ट्रीय ज्युनिअर हॉकी स्पर्धा होणार आहे. सप्टेंबर व ऑक्टोबर



२०२२ मध्ये होणाऱ्या या स्पर्धांसाठी ११ कोटी रुपये खर्चास प्रशासक आणि आयुक्त राजेश पाटील यांनी मान्यता दिली आहे.

**पिंपरी चिंचवड शहराला "स्पोर्ट्स् हब" म्हणून विकसित करण्याचा निर्धार –**

उद्योगनगरी, कामगारनगरी आणि सर्वाधिक वेगाने विकसित होत असलेले शहर असा नावलौकिक असलेल्या पिंपरी चिंचवड शहराला "स्पोर्ट्स् हब" म्हणून विकसित करण्याचा निर्धार महापालिकेने केला आहे. त्यादृष्टीने शहरात विविध खेळांच्या स्पर्धांचे राष्ट्रीय पातळीवर आयोजन केले जात आहे. हॉकी इंडिया, हॉकी महाराष्ट्र आणि पिंपरी पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच शहरामध्ये राष्ट्रीय पातळीवरील हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नेहरूनगरच्या पॉलिग्रास मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धांचे नियोजन महापालिकेने यशस्वीरित्या पार पाडले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरील हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्याची संधी हॉकी इंडियाने महापालिकेला दिल्याचे आयुक्तांनी सांगितले.

### विविध विभागामार्फत सोयी सुविधा आणि कामे करण्यासाठी खर्चास मान्यता –

त्यानुसार, सहा देशांची आंतरराष्ट्रीय ज्युनिअर हॉकी स्पर्धा येत्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात घेण्याचे नियोजन असून त्यासाठी विविध विभागामार्फत सोयी सुविधा तसेच कामे करण्यासाठी होणाऱ्या ११ कोटी रूपये खर्चास मान्यता दिली असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

## शॉर्ट न्यूज »

### आंबेगावात माजी आयपीएस अधिकाऱ्याच्या मुलाचा खून

।पुणे। महाईन्यूज ।

पुण्यातील भारती विद्यापीठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत किरकोळ कारणावरून झालेल्या तुंबळ हाणामारीत माजी आयपीएस अधिकारी रघुनाथ खैरे यांच्या मुलाचा टोळक्याने खून केला आहे. नरेंद्र रघुनाथ खैरे (वय ३३) असे खून झालेल्या तरूणाचे नाव आहे.

आंबेगाव परिसरात असणाऱ्या साई विश्व सोसायटीजवळील प्यासा बारच्या पार्किंगमध्ये मृत युवक नरेंद्र खैरे आणि टोळक्यातील युवकांशी किरकोळ कारणावरुन वाद झाला होता.

नरेंद्र खैरे यांने बारच्या पार्किंग मधील आपली कार काढत असताना युवकांसोबत वाद झाल्यानंतर आरोपीने नरेंद्र खैरे यांना त्यांच्या नाजुक भागावर मारहाण करुन त्याला जखमी अवस्थेत खाली फेकून दिले. त्यात नरेंद्र खैरेचा मृत्यु झाला आहे. नरेंद्र खैरेच्या खूनप्रकरणी युवराज कांबळे, ओंकार रिटे, वैभव आदाटे, मनोज सुर्य्रवंशी आणि विष्णू कदम या सहा जणांवर भारतीय विद्यापीठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याकडेच आढळरावांचा रोख

# महाविकास आघाडीच्या नावाखाली पुणे जिल्ह्यातून शिवसेना संपवण्याचे कारस्थान

## शिवाजीराव आढळराव पाटील यांनी व्यक्त केली व्यथा

पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाविकास आघाडीच्या नावाखाली पुणे जिल्ह्यातून शिवसेनेला संपवण्याचे कारस्थान सुरू आहे. सरकारला विरोध नाही. मात्र, गावागावांत शिवसैनिकांवर अन्याय होतो आहे. प्रत्येक गोष्ट मुख्यमंत्र्यांना सांगता येत नाही, अशी व्यथा शिवसेनेचे ज्येष्ठ नेते व माजी खासदार शिवाजीराव आढळराव यांनी पक्षाच्या मेळाव्यात बोलताना व्यक्त केली. उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याकडेच आढळराव यांचा रोख होता. तथापि, त्यांनी पवारांचा थेट नामोल्लेख केला नाही.

मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी शिरूर लोकसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांचा मेळावा संपर्कप्रमुख सचिन अहिर यांच्या उपस्थितीत चाकणला पार पडला. यावेळी बोलताना आढळराव यांनी सध्याच्या शिवसेनेतील घडामोडींवर भाष्य करतानाच पक्षनेतृत्वाकडून स्थानिक पातळीवर वेळोवेळी होत आलेले दुर्लक्ष आणि त्याचा गैरफायदा घेऊन राष्ट्रवादीने शिवसेनेच्या विरोधात चालवलेले कुरघोडीचे राजकारण, याचा सविस्तर पाढाच संपर्कप्रमुखांसमोर वाचला.

आढळराव म्हणाले, महाविकास आघाडीचे सरकार अस्तित्वात आल्यापासून शिवसेनेला पुणे जिल्ह्यात सर्वाधिक फटका बसला असून खेड मतदारसंघाला जास्तच भोगावे लागले. या तालुक्यातील शिवसेनेच्या ऱ्हासाचे कारण राष्ट्रवादी काँग्रेस हेच आहे. खेड पंचायत समितीची प्रशासकीय इमारत बांधण्याचे काम शिवसेनेच्या आमदाराने मंजूर करून आणले. मात्र, शिवसेनेला श्रेय मिळणार म्हणून राष्ट्रवादीचे आमदार दिलीप मोहिते यांनी कितीतरी खटाटोप केला. सव्वा वर्षापूर्वी खेड तालुक्यात झालेल्या बंडखोरीचा मोठा फटका शिवसेनेला बसला होता. तेव्हा त्या गद्दारीचा निषेध करण्यासाठी कोणीही पुढे आले नाही.

पक्षातून साधी दखलही कोणी घेतली नाही. पक्षातील घाणेरड्या राजकारणाचा अनुभव आला. कितीही बाका प्रसंग आला तरी, शिवसेनेने एकजूट कायम ठेवली पाहिजे. बोटचेपे धोरण ठेवता कामा नये.

अडचणीच्या काळात जर पक्षच पाठीशी उभा राहणार नसेल, तर कशासाठी लोक शिवसेनेत येतील? राष्ट्रवादीचे आमदार दिलीप मोहिते राज्यसभा तसेच विधान परिषद निवडणुकीवेळी मतदानासाठी टाळाटाळ करत होते. मुख्यमंत्र्यांवर नाराज असल्याची विधाने जाहीरपणे करत होते, याकडे आढळराव यांनी लक्ष वेधले.

पालकमंत्री अजित पवार यांनी अलीकडेच दीडशे ते दोनशे कामांचे शासन निर्णय (जीआर) काढले. इतकेच नव्हे तर, पुणे जिल्हा नियोजन समितीचा १७८ कोटींचा निधी त्यांच्या निकटवर्तीयांना एकतर्फी वाटण्यात आला. पुणे जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आहेत.

या सर्व ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसला फायदेशीर ठरतील, अशाच पध्दतीने प्रभागरचना झाल्या आहेत. याविषयी काहीही सांगण्याचा प्रयत्न केला, तरी ऐकून घेतले जात नाही.

हे चाललयं काय, राष्ट्रवादीला आम्ही आणखी किती सहन करायचे आहे. याबाबतच्या सर्व गोष्टींचा विचार झाला पाहिजे, अशी अपेक्षा आढळराव यांनी संपर्कप्रमुखांकडे व्यक्त केली.



### बंड झाल्यानंतर शिवसेना होते अधिक बळकट..

शिवसेनेच्या इतिहासात कधी नव्हे ती विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. बंडखोरी आणि गद्दारी शिवसेनेला नवीन नाही. अनेक संकटांचा सामना करत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची वाटचाल सुरू ठेवली. जेव्हा-जेव्हा बंड झाले, त्यानंतर शिवसेना अधिक भक्कम होते, हा इतिहास आहे. शिवसैनिकांमध्ये संतापाची लाट पसरलेली आहे. जागोजागी, गावोगावी निदर्शने होत आहेत. पक्षावर आलेले संकट लवकरच दूर होईल. शिरूर मतदारसंघातील शिवसेना पूर्णपणे उध्दव ठाकरे यांच्या पाठीशी आहे, असे शिवाजीराव आढळराव यांनी यावेळी स्पष्ट केले.

# संजय राऊतांनी स्वत:ला आवरावं अन्यथा ठोकून काढू

## छावा संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष नानासाहेब जावळे-पाटील यांची थेट धमकी

पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिवसेनेचे प्रवक्ते व खासदार संजय राऊत मराठा समाजाविरोधात अभद्र शब्द वापरत आहेत. त्यांनी स्वत:ला आवरावं अन्यथा छावा संघटनेचे छावे त्यांना ठोकून काढतील, असा इशारा छावा संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष नानासाहेब जावळे-पाटील यांनी आज पुण्यात बोलताना दिला. शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे (Eknath Shinde) उद्या मुंबईत येत आहेत. त्यांच्या संरक्षणासाठी हजारो छावे मुंबईत दाखल होतील, असे जावळे-पाटील यांनी सांगितले. छत्रपती संभाजीराजांना खासदारकीपासून रोखण्याचं काम शिवसेना आणि संजय राऊतांनी केल्याचा आरोपही जावळे-पाटील यांनी केला आहे. ते म्हणाले, " राज्यात शेतकरी मरत आहेत आणि राऊत राजकीय पोळी भाजत आहेत.

मराठा समाजाविषयी खासदार राऊत कसलेही अभद्र शब्द वापरतात आहेत.त्यांनी स्वत:ला आवारावे, अन्यथा संघटनेचे छावे त्यांना ठोकून काढल्याशिवाय राहणार नाहीत."

आपल्या न्याय्य मागण्यांसाठी राज्यातील मराठा समाजाने लाखोच्या संख्येने मूक मोर्चा काढला. कुठेही तणाव निर्माण होऊ दिला नाही. मात्र, या मोर्चाला मुका म्हणून खासदार राऊत यांनी हिणवले होते. आमचा पक्षाला विरोध नाही सध्या जे सुरू आहे. त्यातून होणाऱ्या क्रांतीला आमचा पाठिंबा आहे, असे जावळे-पाटील यांनी सांगितले.

जावळे-पाटील म्हणाले, " मुंबई तुमच्या बापची नाही. हा महाराष्ट्र मराठ्यांचा आहे. खासदार राऊतांनी आपली टवाळकी बाहेर जाऊन करावी. राज्यात यापुढे ठाकरेशाही चालणार नाही. आम्ही सत्तेसाठी कधीही लाचारी स्वीकारली नाही, हे त्यांनी लक्षात घ्यावे."



## शॉर्ट न्यूज

### एकनाथ शिंदेंच्या समर्थनात पिंपरीत शिवसैनिकांनी 'फ्लेक्स' फाडला

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

एकनाथ शिंदे यांच्या समर्थनाचा फ्लेक्स पिंपरीतील मोरवाडी चौकात झळकल्याने एकच खळबळ उडाली. मात्र शहातील शिवसैनिकांना ही माहिती मिळताच त्यांनी हा फ्लेक्स फाडून टाकला आहे. दरम्यान नेमका हा फ्लेक्स कोणी लावला याची माहीती मिळू शकली नाही. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर महाराष्ट्रात शिवसेनेमध्ये उभी फूट पडली असताना पिंपरी चिंचवडमध्ये मात्र शिवसैनिकांनी उद्धव ठाकरे यांना पाठिंबा व्यक्त केला आहे. काल संपर्कप्रमुख सचिन अहिर यांनी पदाधिकाऱ्यांची बैठक घेत शहरात शिवसेना एकसंध असल्याचं स्पष्ट केले. मात्र त्याच्या दुसऱ्याच दिवशी शहरामध्ये मोरवाडी चौकात एकनाथ शिंदे समर्थनात फ्लेक्स लागले आहे. मात्र काही वेळातच शिवसैनिकांनी हे फ्लेक्स फाडून टाकले आहे. सचिन अहिर कालच शहात येऊन गेले असताना त्याच्या दुसऱ्याच दिवशी फ्लेक्स लागल्याने ते नेमकं कोणी लावलं याची चर्चा सुरू झालीय.

### निवडणूक अधिकाऱ्यांची माहिती मागवली, भाजपाचे माजी नगरसेवक विकास डोळस यांची आयोगाकडे तक्रार

# मतदार याद्यांमध्ये राजकीय हस्तक्षेप!

## महापालिकेचे जितेंद्र वाघ, बाळासाहेब खांडेकर यांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक विभागाने तयार केलेल्या मतदार याद्यांमध्ये राजकीय हस्तक्षेप झाला असून, संबंधित आधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच, अधिकाऱ्यांबाबत गोपनीय माहिती द्यावी, अशी मागणी भाजपाचे माजी नगरसेवक विकास डोळस यांनी केली आहे.

याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे अध्यक्ष यु. पी.एस. मदान यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक विभागाने मतदार यादी प्रसिद्ध केल्या आहेत. मात्र, या मतदार याद्या तयार करताना विशिष्ट राजकीय पक्षांच्या विशिष्ट लोकांच्या सल्ल्याने आणि हेतुपुरस्सर हस्तक्षेप केला आहे, अशी आमची



तक्रार आहे. दि. १३ जून २०२२ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध झाल्यानंतरप्रभागनिहाय मतदार याद्या तयार करण्यात आल्या. सदर मतदार याद्यांचे विभाजन करताना निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन केले आहे. काही प्रभागांमध्ये सीमेबाहेरील मतदारांचा समावेश केला आहे. दुसरीकडे, काही प्रभागातील मतदारांची नावे अन्य प्रभागांमध्ये नियमबाह्यपणे समाविष्ट केली आहे, असे निरीक्षणास आले आहे.

राज्य निवडणूक आयोगाचे अध्यक्ष यु.पी.एस. मदान यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक विभागाने मतदार यादी प्रसिद्ध केल्या आहेत. मात्र, या मतदार याद्या तयार करताना विशिष्ट राजकीय पक्षांच्या विशिष्ट लोकांच्या सल्ल्याने आणि हेतुपुरस्सर हस्तक्षेप केला आहे, अशी आमची तक्रार आहे. दि. १३ जून २०२२ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध झाल्यानंतरप्रभागनिहाय मतदार याद्या तयार करण्यात आल्या. सदर मतदार याद्यांचे विभाजन करताना निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन केले आहे. काही प्रभागांमध्ये सीमेबाहेरील मतदारांचा समावेश केला आहे. दुसरीकडे, काही प्रभागातील मतदारांची नावे अन्य प्रभागांमध्ये नियमबाह्यपणे समाविष्ट केली आहे, असे निरीक्षणास आले आहे.

### अधिकाऱ्यांची माहिती द्या अन् चौकशी करा : डोळस

राज्य निवडणूक आयोगाने मतदार यांदी प्रसिद्ध केल्यापासून विशिष्ठ राजकीय पक्षांचे स्थानिक व्यक्ती निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांच्या कार्यालयामध्ये ठाण मारुन बसले आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ आणि बाळासाहेब खांडेकर यांच्या कार्यालयात विशिष्ट राजकीय पक्षाचे व्यक्ती वावरतात. त्यांच्या सूचनेनुसार, अधिकारी काम करीत आहेत काय? असा प्रश्न विकास डोळस यांनी उपस्थित केला आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या दालनामधील गेल्या दोन महिन्यांचे सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल हिस्टरी- व्हॅट्सअॅप चॅट आणि मुंबई अथवा राज्याबाहेर प्रवास केल्यानंतर कुठे मुक्काम केला? किती वेळा प्रवास केला? कुणाशी संपर्क केला? त्यांना कोण भेटले? मोबाईल नंबर कोणाशी बोलले? याबाबत गोपणीय अहवाल तयार करावा. याद्वारे संबंधित अधिकारी यांच्या कार्याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणीही विकास डोळस यांनी केली आहे.

विशिष्ट राजकीय हेतूने प्रभागातील लोकसंख्येनुसार, मतदार खूप कमी किंवा जास्त प्रमाणात करण्यात आले आहे.

तसे काम काही ठराविक प्रभागात हेतूपुरस्सर व कुणाच्या तरी सांगण्यावरुन केले आहे. ही बाबत निकोप लोकशाहीला घातक आहे, असेही विकास डोळस यांनी म्हटले आहे.

विशेष महणजे, याबाबत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, पुण्याचे जिल्हाधिकारी राजेश देशमुख, विभागीय आयुक्त सौरभ राव, महापालिका आयुक्त राजेश पाटील आणि भारतीय निवडणूक आयोगाकडेही तक्रार करण्यात आली आहे.

# महानगरपालिकेच्या प्रारूप मतदार याद्यांवर हरकतींसाठी ३ जुलैपर्यंत मुदतवाढ

## 1 जुलै 2022 पर्यंतची मुदत आता 3 जुलै 2022 पर्यंत वाढविण्यात आली

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

विविध १४ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्यांवर हरकती व सूचना दाखल करण्यासाठी असलेली १ जुलै २०२२ पर्यंतची मुदत आता ३ जुलै २०२२ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड, बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, वसई-विरार, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, अकोला, अमरावती आणि नागपूर महानगरपालिकेच्या



सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या संबंधित महानगरपालिका, त्यांचे संकेतस्थळ आणि टू- व्होटर मोबाईल अॅपवरही उपलब्ध आहेत. त्यावर १ जुलै २०२२ पर्यंत हरकती व सूचना दाखल करण्याची मुदत होती. परंतु ही मुदत आता ३ जुलै २०२२ पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यासाठी रविवार व शनिवारच्या सुट्टीच्या दिवशीदेखील आवश्यक ती व्यवस्था करण्यात येणार आहे.

महानगरपालिका कार्यालय किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या ठिकाणी आणि टू- व्होटर मोबाईल अॅप्द्वारेदेखील हरकती व सूचना दाखल करता येतील. टू- व्होटर मोबाईल अॅप 'प्ले स्टोअर'वरून आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करता येईल. त्याआधारे प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादीत आपले नाव शोधून त्याबाबत हरकत असल्यास तीही दाखल करता येईल. 'व्होटर लीस्ट' सर्च या मेनूवर क्लिक केल्यावर आपले नाव व मोबाईल नंबर टाकून पुढे जाता येईल. नाव शोधल्यावर आपला संपूर्ण तपशील दिसू शकेल. त्यासंदर्भातील हरकतीसाठी 'व्होटर लीस्ट ऑबजेक्शन' यावर क्लिक करून 'व्होटर लीस्ट इलेक्शन प्रोग्राम २०२२' निवडून पुढे योग्य त्या पर्यायावर जाऊन आपली हरकत नोंदविता येईल.

विधानसभा मतदारसंघाची यादी प्रभागनिहाय विभाजित करताना त्यात नवीन नावांचा समावेश करणे किंवा नावे वगळण्याचा राज्य निवडणूक आयोगाला अधिकार नाही. एखाद्या मतदारास चुकीचा प्रभाग वाटप झाल्यास किंवा विधानसभेच्या मतदार यादीत नाव असूनही महानगरपालिकेच्या मतदार यादीत नाव नसल्यास, हरकत दाखल करता येते. हरकती व सूचना दाखल करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असली तरी प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या ९ जुलै २०२२ रोजीच प्रसिद्ध

## संपादकीय »

# महाराष्ट्र से उडा, गुवाहाटी में अटका!

***राज्यातील सत्ताधारी महाविकास आघाडीतील नगरविकास मंत्री आणि शिवसेनेचे मातोश्रीशी जवळीक असलेले ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडामुळे राज्यात सध्या राजकीय अनिश्चितता निर्माण झाली आहे.***

शिवसेनेत यापूर्वी काही वेळा फूट पडली आणि त्यांच्यातील नेते काही आमदार घेऊन बाहेर पडले आणि ते दुसऱ्या पक्षात सहभागी झाले किंवा त्यांनी स्वत:ची राजकीय संघटना स्थापन केली, पण आता जी शिवसेनेत फूट पडली आहे, ती अभूतपूर्व अशा प्रकारची आहे. कारण जे फुटून सुरत मार्गे गुवाहाटीला गेलेले आहेत, त्यांच्यामुळे शिवसेना आणि शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे हादरून गेले आहेत. कारण गुहावाटीला शिंदे गटात जे आमदार आहेत, त्यांच्या तुलनेत उद्धव ठाकरे यांच्याकडे असलेल्या आमदारांची संख्या खूपच कमी आहे.

सुरुवातीला उद्धव ठाकरे आणि शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत, तसेच पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी कठोर भूमिका घेतली, पण जसे दिवस पुढे सरकत आहेत, तसे शिंदे गटात सहभागी होणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळेच ही जी अस्वस्थता दिसत आहे, त्याचे स्वरुप खूप व्यापक आहे, हे आता शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनाही लक्षात घ्यावे लागत आहे, म्हणूनच त्यांनी आता नरमाईची भूमिका घेतली आहे. तुम्ही परत या, अजून वेळ गेलेली नाही. माझ्या समोर येऊन बोला, मी कुटुंबप्रमुख या नात्याने तुम्हाला काय म्हणायचे आहे ते समजून घेईन, असे आवाहन उद्धव ठाकरे यांच्याकडून शिंदे गटाला करण्यात आले आहे, पण शिंदे गटाची मागणी अशी आहे की, उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडावे आणि भाजपमध्ये सहभागी व्हावे. म्हणजेच पूर्वीसारखी भाजपसोबत युती करावी, असेच त्यांचे म्हणणे आहे, हे स्पष्ट होत आहे. शिंदे हे भाजपचे नाव घेत आहेत, त्यामुळे या सगळ्या घडामोडींमागे कोण सूत्रधार आहे काही वेगळे सांगण्याची गरज नाही. कारण आजवर जेव्हा शिवसेनेत बंड झाले तेव्हा ते लोक महाराष्ट्र सोडून बाहेरच्या राज्यांमध्ये गेले नव्हते. सध्या शिवसेनेत बंड तर झालेले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाकडे उभ्या देशाचे लक्ष लागले आहे.महाराष्ट्रात २०१९ सालच्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे सगळ्यात जास्त आमदार असूनही त्यांची सत्ता येऊ शकली नाही. त्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मी शिवसेनाप्रमुखांना शिवसैनिकाला मुख्यमंत्री बनवण्याचे वचन दिले आहे.



## आनंदी सकाळ

# चैतन्य साऱ्या सजीवांत व निर्जीवांत असतेच

दुसरे मन फक्त तुमचे हित कशात आहे ते पाहूनच निर्णय घेते. तो अंतरात्मा. या अंतरात्म्याच्या अनुसंधानातच आपण राहिले पाहिजे; जेणेकरून आपली जाणीव विरल होत जाऊन त्या विश्वात्म्याशी, विश्वाच्या चालक शक्तीशी आपले अनुसंधान राहते. 'मी' आहे, ही जाणीव मला आहे, माझ्या मुलीला आहे, माझ्या आईलाही आहे. 'मी' आहे, ही जाणीव माणसाच्या जन्मापासून आहे. देह बदलतील; पण जाणीव असतेच. या अर्थाने ती अमर आहे. जळणे, तुटणे, फुटणे इत्यादी विकार देहाला होतात; जाणिवेला नाही. ती सूक्ष्म आहे. ती आहे हे आपल्याला कळते; कारण तिच्या अस्तित्वामुळेच आपल्याला 'मी'चे भान असते. या जाणिवेने, चैतन्याने सारे ओतप्रोत भरलेले आहे. सजीवांत, म्हणजे प्राणिमात्रांत किंवा फळाफुलांत चैतन्य आहे. ते आपल्याला दिसते किंवा भासते. ज्या गोष्टी जड आहेत, उदा. लाकूड, कागद, लोखंड इत्यादींतही हे चैतन्य असतेच.



## भूमिका

# संकट पीकपाण्याचे...



महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन झाल्याची वर्दी हवामान खात्याने दिली, त्याला दोन आठवड्यांहून अधिक दिवस झाले असले, तरी राज्याच्या बहुतेक भागाला अद्याप पावसाची प्रतीक्षा आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या चारही हवामान विभागांत फारसा पाऊस झाला नाही. काही ठिकाणी दोन-चार सरी आल्या, काही ठिकाणी तुरळक पाऊस झाला; मात्र बहुतेक भाग कोरडाच राहिला. धुळे, नंदूरबारपासून नाशिक, नगर, पुणे, सोलापूर, कोल्हापूर अशी मोठी व्याप्ती असलेल्या मध्य महाराष्ट्रात जूनमधील पावसाची सरासरीपेक्षा असलेली तफावत ६० टक्क्यांहून अधिक आहे. मराठवाड्यात गेल्या काही दिवसांत पाऊस होतो आहे; परंतु जूनची सरासरी काही गाठली गेलेली नाही. विदर्भातही मान्सूनचे पहिले दोन आठवडे कोरडे गेले; नंतरच्या आठवड्यात स्थिती बरी असल्याचे हवामान खाते आकडेवारी दर्शविते. एरवी भरभरून बरसणाऱ्या पावसाने कोकणाकडे पाठ फिरविल्याचे चित्र असून, तिथेही सरासरीपेक्षा साठ ते सत्तर टक्के पाऊस कमी आहे. लांबलेल्या पावसामुळे बहुतेक पेरण्या खोळंबल्या; ज्या झाल्या त्याही दहा-पंधरा टक्क्यांपेक्षा अधिक नाहीत. पिण्याच्या पाण्याची स्थिती चिंताजनक बनली आहे. धरणांमधील पाणीसाठा झपाट्याने आटत चालला आहे. मुंबईसह काही शहरांत पाणीकपात लागू केली गेली आहे. पुण्यातील पाण्याच्या मुबलकतेबद्दल कुत्सितपणे बोलले जात असले, तरी प्रत्यक्ष या महानगरात पाण्याची समस्या बिकट आहे. पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत जेमतेम पावणेतीन अब्ज घनफूट (टीएमसी) पाणीसाठा शिल्लक आहे. उजनी धरणातील पाणीसाठा उणे असून, एकंदरीत राज्यातील धरणसाठा सरासरी वीस टक्क्यांपर्यंत खाली आलेला दिसतो. पाऊस आणखी काही दिवस लांबला, तर पाण्याबाबत आणीबाणी निर्माण होऊ शकते. पाण्याची समस्या अशा प्रकारे बिकट झाली, तर तिला आपण कसे सामोरे जाणार हा कळीचा प्रश्न खरा; परंतु हाच काय अशा कोणत्याच प्रश्नांबाबत आपली तयारी नाही. मुंबईत आणि पुण्यात पाणीकपात लागू होत असल्याने हा विषय ऐरणीवर तरी आला. राज्यातील बहुतेक शहरांसाठी पाणीकपात ही आताची नव्हे, तर नित्याची बाब. मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर यांसारखी काही शहरे वगळता, राज्यातील अन्य शहरांत पाणीपुरवठ्याची स्थिती वाईट आहे.

# स्वाभिमानाचा लढा असल्यास आमदारकी सोडा

**बंड केलेल्या आमदारांना अपात्रतेपासून तात्पुरते संरक्षण मिळाले असले तरी त्यानंतर ते अपात्र ठरणार नाहीतच याची शाश्वती नाही,**



कारण कायदेशीर तरतुदींनुसार त्यांना आपला गट अन्य एखाद्या नोंदणीकृत पक्षात विलीन करावा लागेल. बंड केलेल्या आमदारांनी अद्याप आपण शिवसेनेतच आहोत, असा धोषा सुरू ठेवला आहे. म्हणजे अजूनही त्यांना आपल्याच गटाला ‘मूळ पक्ष’ म्हणून मान्यता मिळेल अशी आशा आहे. म्हणजे त्यांना शिवसेनेचे छत्रही सोडायचे नाही आणि आमदारकीही गमवायची नाही! बंडखोर आमदार म्हणतात त्याप्रमाणे खरोखरच हा स्वाभिमानाचा लढा असेल, तर त्यांनी आमदारकीचा मोह सोडावा आणि राजीनामा देऊन सरकार अल्पमतात आणावे. आणि तसे नसेल, तर हे गुऱ्हाळ चालू ठेवून महाराष्ट्राला वेठीस धरण्यात काय अर्थ आहे?

असे दिसते. पक्षांतरबंदी कायद्यानुसार एखाद्याने पक्षांतर केले, तर त्याला अपात्र ठरविण्यात येते. परंतु दोनतृतीयांश आमदारांनी पक्षांतर केले तर ते अपात्र न ठरता ती पक्षातील फूट आहे असे ग्राह्य धरले जाते. अशा स्थितीत आमदारांचे सदस्यत्व अबाधित राहते, पण त्यासाठी एक अट आहे- मूळ पक्षातून जो गट फुटला आहे त्याला अन्य पक्षात विलीन व्हावे लागते. मात्र या बंडखोरांना शिवसैनिक ही ओळख पुसून नवीन पक्षात विलीन होणे मान्य नाही, म्हणून अजूनही आम्ही शिवसैनिक आहोत, आम्ही शिवसेना सोडलेली नाही असा जप ते करत आहेत. आता या आव्हानाला बंडखोर कसे सामोरे जातील, हे पाहणे महत्त्वाचे ठरते.

## ।। अभंगवाणी ।।



सावध जालों सावध जालों ।
हरिच्या आलों जागरणा ॥१॥
तेथें वैष्णवांचे भार ।
जयजयकार गर्जतसे ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### उद्या मुंबईत राडा होणार नाही! उद्धव ठाकरेंचं शांततेचं आवाहन

। मुंबई । महाईन्यूज ।

शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी नुकताच मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. यावेळी फेसबूक लाइव्हच्या माध्यमातून संवाद साधताना ते म्हणाले की, अनेकांना शिवसैनिकांनी शिवसेनाप्रमुखांनी मोठं केले. ज्यांना मोठे केले तेच विसरले. जे-जे देणे शक्य होते, ते सगळं दिलं. आता मातोश्रीवर अनेक लोक येऊन पाठिंबा देतायत. ज्यांना दिलं ते नाराज झाले आणि ज्यांना काहीच मिळाले नाही, ते सोबत आहेत. हीच शिवसेना सामान्यांच्या पाठिंब्याने सुरू आहे. पुढे बोलताना त्यांनी म्हटलं की, न्याय देवतेने निकाल दिलाय. राज्यपालांनी २४ तासात लोकशाहीचे पालन केले. पण १२ विधानपरिषद सदस्यांच्या यादीबाबत त्यांनी आताही निर्णय घ्यावा. उद्या बहुमत चाचणी असल्याने मुंबईत बंदोबस्त वाढवला आहे. अनेक शिवसैनिकांना स्थानबद्ध केलं जात आहे. त्याबाबतच्या नोटिसा त्यांना आल्या आहेत. केंद्रीय सुरक्षा दलाचे जवान मुंबईत दाखल झाले आहे. कदाचित चीन सीमेवरची सुरक्षा देखील मुंबईत दाखल होईल. मला खरंतर लाज वाटते, ज्या शिवसैनिकांनी या सगळ्या आमदारांच्या विजयाचा गुलाल उधळला होता.

# मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा राजीनामा!

## 31 महिन्यांत आघाडी सरकार कोसळले

। मुंबई । महाईन्यूज ।

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज रात्री उशिरा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी ठाकरे सरकारला बहुमत चाचणी घेण्याचे आदेश दिले होते. त्याला शिवसेनेने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. पण न्यायालयाने त्याला स्थगिती देण्यास नकार दिला. हा महाविकास आघाडीला धक्का होता. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी हा मोठा निर्णय घेतला. त्यामुळे अवघ्या ३१ महिन्यांत आघाडी सरकार कोसळले.राजीनामा दिल्यानंतर मुंख्यमंत्री उद्धव ठाकरे मातोश्रीहून स्वत: गाडी चालवत राजभवनात दाखल झाले. त्यावेळी त्यांच्यासोबत आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरेही होते. राजभवनात उद्धव ठाकरे यांनी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांची भेट घेऊन मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा सुपूर्द केला. ज्यांना शिवसेनेने, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मोठे केले त्यांनीच शिवसेनाप्रमुखांच्या मुलाला मुख्यमंत्रिपदावरून खाली खेचण्याचे काम केले आहे.याचे पुण्य त्यांच्या पदरात पडू देत.त्यांच्यावर मी विश्वास ठेवला हे माझे पाप आहे. मला पदावरून खाली खेचल्याचा आनंद त्यांच्यापासून मला हिरावून



घ्यायचा नाही, असे सांगत उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री आणि विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा राजीनामा देण्याची घोषणा केली.

ठाकरे यांच्या राजीनाम्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सत्तासंघर्षाला पूर्णविराम मिळाला असून ठाकरे सरकार सत्तेवरून पायउतार झाल्याने आज, गुरुवारी विधानसभेत बहुमत चाचणी होणार नाही. त्यामुळे नव्या सरकारचा मार्ग मोकळा झाला असून भाजप आणि शिवसेनेतील एकनाथ शिंदे यांचा बंडखोर गट एकत्र येऊन सरकार स्थापन करण्याच्या हालचालींना आता वेग आला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी दिलेल्या विश्वासदर्शक ठरावाला हिरवा कंदील दाखवला. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी आज समाज माध्यमाद्वारे जनतेशी संवाद साधला. बहुमत चाचणीचा खेळ खेळायचा नाही असे स्पष्ट करून उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाच्या राजीनाम्याची घोषणा केली.ही घोषणा करताना ठाकरे यांनी बंडखोरांना आपल्या शैलीत सूनवताना राज्यपालांचे नाव न घेता त्यांना टोले लगावले..मी आता शिवसेना भवनात बसणार आहे.एका नवीन शिवसेनेची उभारणी परत नव्या जोमाने करणार असल्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. राजीनाम्याची घोषणा करताना उद्धव ठाकरे हे भावनिक झाले होते.

शिवसेनाप्रमुखांनी कोण रिक्षावाला, टपरीवाला अगदी हातभटटीवाल्यालाही मोठे केले. आमदारकी,खासदारकी,मंत्रीपदे दिली.आतापर्यंत ज्यांना मोठे केले जे-जे दयायचे ते दिले तेच आज नाराज आहेत.मात्र ज्यांना काही मिळाले नाही ते मात्र मातोश्री येथे येऊन मला साथ देत आहेत.जे नाराज झाले त्यांनी खरे तर सुरत,गुवाहाटीला न जाता इथे मातोश्रीवर येऊन तरी बोलायला पाहिजे होते.तुम्हाला आम्ही कधीतरी आपले मानले होते मग मनातले सांगायची काय अडचण होती? असेही ते म्हणाले.

आता गुवाहाटीला गेलेले सर्व जण परत येतील.नव्या सरकारची स्थापना होईल.लोकशाहीचा पाळणा हलणार आहे.तो निश्चित हलू दे.एकाही शिवसैनिकाने त्यांना रोखण्यासाठी रस्तयावर उतरू नये. आज मुंबईत अभूतपूर्व बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तुकडया उतरल्या आहेत.कदाचित सैन्याला देखील बोलावतील.ज्या शिवसैनिकांनी या आमदारांच्या विजयाचा गुलाल उधळला होता त्यांच्याच रक्ताने इथले रस्ते माखलेले पाहणे मला आवडणार नाही.त्यामुळे या सगळयांना आरामात मुंबईत येउ दया कोणीही त्यांना रोखू नये असे आवाहनही ठाकरे यांनी केले. उद्या होणारी फलोअर टेस्ट वगैरे प्रकारच मला आवडत नाही.

### शरद पवार-सोनिया गांधींचे आभार

जे विरोधात होते ते माझ्यासोबत उभे राहिले. माझीच माणसे सोडून गेल्याचे दुःख व्यक्त करताना उद्धव ठाकरे यांनी शरद पवार आणि सोनिया गांधी यांचेही आभार मानले.सरकार चालविताना यांनी मला कायम साथ दिली. आज औरंगाबादचे संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशीव करतानाचा निर्णय घेताना कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मंत्रयांनी एका अक्षरानेही विरोध केला नाही.अशोक चव्हाण तर मला म्हणालेही की,तुमच्या पक्षातील काही आमदारांचा जर आम्हाला विरोध असेल तर आम्ही सरकारला हवे तर बाहेरून पाठिंबा देतो.पण तुम्ही सरकार चालवा.आज संभाजीनगरचा निर्णय घेताना मी,आदित्य,सुभाष देसाई,अनिल परब हेच मंत्री होते.पण जे पाहिजे होते ते नव्हते. हे सरकार आल्यापासून सगळे चांगले चालले होते.आम्ही महत्वाचे निर्णयही घेतले.पण चांगले चालल्याला नेहमीच नजर लागत असते या सरकारलाही ती लागली.ती कोणाची ते तुम्ही जाणता असेही ठाकरे म्हणाले.आमच्या काळात राज्यात एकही धार्मिक दंगल झाली नाही.देशात सीएए,एनआरसीवरून वाद पेटलेला असताना महाराष्ट्र मात्र शांत होता.त्यासाठी मुस्लिम बांधवांनाही श्रेय दिले पाहिजे, असेही उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

### अडीच वर्षात दुसरे सरकार कोसळले

उद्धव ठाकरे यांच्या राजीनाम्यामुळे गेल्या अडीच वर्षांत कोसळलेले हे दुसरे सरकार आहे. 23 नोव्हेंबर 2019मध्ये मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शपथ घेतली होती. पण सर्वोच्च न्यायालयात या सरकारला आव्हान देण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयाने खुले मतदान घेण्याचा आदेश दिल्यावर दोघांनीही राजीनामा दिला होता. हे सरकार 80 तासांचे ठरले. आताही सर्वोच्च न्यायालयाने बहुमत चाचणीला स्थगिती देण्यास नकार दिल्यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज राजीनामा दिला.

# माझ्याच लोकांनी दगा दिला - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

## मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केल्या भावना

। नवी मुंबई । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाची बैठक नुकतीच पार पडली आहे. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहे. बहुचर्चित औरंगाबादचं नामकरण संभाजीनगर करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. याशिवाय उस्मानाबादचं नामकरण धाराशीव करण्याचा प्रस्ताव देखील मंजूर करण्यात आला.



या बैठकीनंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला असून बैठकीत नेमकं काय घडलं याचा खुलासा केला आहे.

माध्यमांशी बोलताना जयंत पाटील म्हणाले की,"मुख्यमंत्र्यांनी आज वेगवेगळ्या विचारसरणीच्या तीन पक्षांनी एकत्र येऊन काम करत असताना केलेल्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केलं. दोन्ही पक्षांचं सहकार्य मिळालं, पण माझ्या पक्षाच्या काही लोकांनी दगा दिला, हे दुर्भाग्य आहे. त्यांनी साथ दिली नाही, याबद्दल दुःख व्यक्त केलं. माझ्याकडून कुणाचा अपमान झाला असेल, किंवा कुणी दुखावलं असेल तर माफी मागतो," असं मुख्यमंत्री मंत्रिमंडळाच्या बैठकीत बोलल्याची माहिती जयंत पाटलांनी दिली.

महाविकास आघाडी सरकारच्या मंत्रिमंडळाची ही अखेरची बैठक आहे का? असं विचारलं असता जयंत पाटील म्हणाले, "मुख्यमंत्र्यांनी राजीनाम्याबाबत कोणतंही भाष्य केलं नाही. सध्या हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं आहे. न्यायालयाने सांगितलं तर उद्या विश्वासदर्शक ठराव होईल. त्यानंतर कळेल ही शेवटची बैठक आहे की नाही," असंही पाटील म्हणाले.

याशिवाय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत पुढील काही निर्णय देखील घेण्यात आले आहेत. "राज्यासाठी हळद संशोधन व प्रक्रिया धोरण लागू करणार. हिंगोली जिल्ह्यात मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणार. कर्जत (जि. अहमदनगर) येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) न्यायालय स्थापन करणार, अहमदनगर – बीड – परळी वैजनाथ या नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पाच्या सुधारित खर्चास मान्यता व त्यासाठी राज्य शासनाचा हिस्सा देणार आहे."

### शॉर्ट न्यूज »

**उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीची तारीख जाहीर**



**।नवी दिल्ली । महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

निवडणूक आयोगाने उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. निवडणुकीची अधिसूचना 5 जुलै रोजी जारी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. यासाठी 19 जुलैपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. आयोगाने निवडणुकीसाठी 6 ऑगस्ट ही तारीख निश्चित केली आहे. या पदासाठी भाजपकडून मुख्तार अब्बास नक्वी यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. याआधी राष्ट्रपतींच्या निवडणुकीसाठी सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांचे उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. एनडीएने महिला आदिवासी नेत्या द्रौपदी मुर्मू यांना राष्ट्रपतीपदासाठी उमेदवारी दिली आहे. तर विरोधकांनी यशवंत सिन्हा यांना संयुक्त उमेदवार म्हणून उमेदवारी दिली आहे. दोन्ही उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. येत्या 22 जुलै रोजी राष्ट्रपतीपदासाठी निवडणूक पार पडणार आहे. व्यंकय्या नायडू यांचा उपराष्ट्रपती म्हणून कार्यकाळ 10 ऑगस्ट 2022 रोजी संपत आहे. घटनेच्या कलम 68 नुसार उपराष्ट्रपतीचा कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी या पदासाठी निवडणूक घेणे आवश्यक आहे.

# "आम्हीच खरी शिवसेना", शिंदे गटाचा सुप्रीम कोर्टात मोठा दावा

## आमच्याकडे बहुमत, शिंदे गटाचा सुप्रीम कोर्टात दावा

**।मुंबई ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**



आम्ही शिवसेना सोडत नाहीत आहोत, आम्हीच शिवसेना आहोत आणि आमच्याकडे बहुमत आहे असा दावा एकनाथ शिंदे गटाच्या वकिलांनी सुप्रीम कोर्टात केला आहे. एकनाथ शिंदे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ नीरज कौल यांनी बाजू मांडली. यावेळी त्यांनी ५५ पैकी ३९ आमदार एकनाथ शिंदेंसोबत असल्याचा दावा केला. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी बहुमत सिद्ध करण्याचा आदेश दिल्यानंतर शिवसेनेने सुप्रीम कोर्टात धाव घेतली आहे. सुनील प्रभू यांच्या वतीने ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी बाजू मांडली. तर एकनाथ शिंदेंच्या वतीने नीरज कौल यांनी आणि राज्यपालांच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता युक्तिवाद करत आहेत.

न्यायमूर्तींनी बंडखोर गटात नेमके किती आमदार आहेत? अशी विचारणा कौल यांना केली. यावर त्यांनी माझ्या माहितीप्रमाणे ५५ पैकी ३९ आहेत असं सांगितलं. यामुळे विश्वासदर्शक ठरावाविरोधात प्रचंड अस्वस्थता असल्याचंही ते म्हणाले. तसंच यापैकी किती जणांना अपात्रतेची नोटीस मिळाली आहे? असं विचारलं असता १६ असं त्यांनी सांगितलं. यावेळी कौल यांनी आम्ही शिवसेना सोडत नसून, आम्हीच शिवसेना आहोत असं सांगितलं. आमच्याकडे बहुमत असल्याचा दावाही यावेळी त्यांनी केला. "९ अपक्ष आमदारही आम्हाला समर्थन देत आहेत. उद्धव ठाकरेंना असणारा १४ जणांचा पाठिंबा म्हणजे अपेक्षाहीन अल्पसंख्य आहे," असंही ते म्हणाले. उपाध्यक्षांचा आमदारांच्या अपात्रतेसंदर्भातील निर्णय होत नाही तोपर्यंत चाचणी घेतली जाऊ नये अशी विनंती त्यांनी केली. तुम्ही जो पात्रतेसंदर्भातील युक्तिवाद करत आहात त्याचा बहुमत चाचणीवर काय परिणाम होईल अशी विचारणा न्यायाधीशांकडून करण्यात आली. यावर मनू सिंघवी यांनी उद्या उपाध्यक्षांनी आमदारांना अपात्र ठरवल्यास कोर्ट हा निर्णय पुन्हा कसा फिरवणार? असा प्रश्न उपस्थित केला. ११ जुलैला होणाऱ्या निर्णयानंतर हा निर्णय घेतला पाहिजे असंही ते म्हणाले.

११ जुलैला हे आमदार अपात्र ठरले तर त्यांची अपात्रता २१ जूनपासून ग्राह्य धरली जाईल. त्यानुसार हे आमदार गुरुवारी होणाऱ्या बहुमत चाचणीसाठी पात्र नसतील असाही युक्तिवाद करण्यात आला. हे अत्यंत घाईत सुरु आहे. राज्यपालांनी करावे अथवा करु नये पण मुख्यमंत्र्याच्या मदत आणि सल्ल्यानुसार कार्य केले पाहिजे. ते विरोधी पक्षनेत्याच्या सल्ल्यानुसार नक्कीच वागू शकत नाहीत असंही सिंघवी म्हणाले. सिंघवी यांनी सुप्रीम कोर्टाला मागील सुनावणीत विश्वासदर्शक ठराव आल्यास आमचं म्हणणं ऐकून घेतलं जाईल असं आश्वासन दिल्याची आठवण करुन दिली. सिंघवी यांनी यावेळी ३४ बंडखोर आमदारांनी राज्यपालांनी लिहिलेल्या पत्राचं वाचन केलं.

न्यायमूर्ती कांत यांनी यावेळी सिंघवी यांना तुमच्या पक्षाच्या ३४ सदस्यांनी पत्रावर स्वाक्षरी केलेली नाही यावर तुमचा वाद आहे का? अशी विचारणा केली. त्यावर सिंघवी यांनी याची पडताळणी झालेली नाही. राज्यपालांनी एक आठवडा पत्र आपल्याकडे ठेवलं, विरोधी पक्षनेत्यांनी भेट घेतल्यानंतरच त्यांनी कारवाई केल्याचं म्हटलं. यावर न्यायमूर्तींनी आपण राज्यपालांच्या समाधानावर संशय घ्यावा का? अशी विचारणा केली. त्यावर सिंघवी यांनी राज्यपालांची प्रत्येक कृती न्यायालयीन पुनरावलोकनाच्या अधीन असल्याचं सांगत दाखला दिला. तसंच कोर्टाच्या निकालाची वाट पाहत असताना नुकतंच करोनामधून बरे झालेले राज्यपाल विरोधी पक्षनेत्यांच्या भेटीनंतर दुसऱ्याच दिवशी बहुमत चाचणीची मागणी कशी करू शकतात? अशी विचारणा सिंघवी यांनी केली. राज्यपालांना खटल्यात पक्षकार करता येत नाही? सिंघवींनी स्पष्ट केलं कलम ३६१ राज्यपालांना संरक्षण देणारं घटनेचं कलम ३६१ काय आहे? कलम ३६१चा अर्थ होतो की राज्यपालांना आपण कोणत्याही खटल्यात पक्षकार करू शकत नाही. त्यासाठीच आम्ही राज्यपालांच्या सचिवांना या खटल्यात पक्षकार केलं आहे. पण अशा प्रकारे खटल्यापासून संरक्षणाचा असा अर्थ होत नाही की त्यांनी केलेल्या चुकीच्या गोष्टींची चाचपणी केली जाऊ शकत नाही असं अभिषेक मनू सिंघवी यांनी सांगितलं.

### शिवसेनेच्यावतीने अभिषेक मनू सिंघवी यांचा युक्तिवाद

अभिषेक मनू सिंघवी यांनी सुरुवातीला आपल्याला सात ते आठ मुद्दे मांडायचे आहेत असं सांगितलं. ज्या पत्रात बहुमत चाचणीचा उल्लेख करण्यात आला आहे त्यात २८ जूनला विरोधी पक्षनेत्याने राज्यपालांची भेट घेतली आणि आज सकाळी आम्हाला उद्या बहुमत सिद्ध करण्याची सूचना मिळाली. राष्ट्रवादीच्या दोन आमदारांनी करोनाची लागण झाली आहे आणि एक काँग्रेस आमदार परदेशात आहेत असं यावेळी त्यांनी सांगितलं.

# अग्नीवीर- हवाई दलाकडे ६ दिवसांत २ लाखांहून जास्त अर्ज

**।नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



वादात सापडलेल्या अग्नीवीर भरती योजनेसाठी भारतीय हवाई दलाकडे पहिल्या केवळ ६ दिवसांत तब्बल २ लाखांहून जास्त युवकांनी ऑनलाईन अर्ज केल्याची माहिती आज देण्यात आली. येत्या ५ जुलैपर्यंत अर्ज करता येतील. या योजनेत ४-४ वर्षांसाठी दरवर्षी ४५ हजारांहून जास्त तरूणांची भरती करण्यात येईल. ४ वर्षांनी त्यातील ७५ टक्के तरूणांना सैन्यदलांतून सेवामुक्त केले जाईल. हवाई दलाने या तरूणांना 'अग्नीवीरवायू' असे संबोधन दिले आहे.

भगवतगीतेच्या ११ व्या अध्यायातील २४ व्या श्लोकावरून घेतलेले 'नभःस्पर्शम् दीप्तम' (आकाशाप्रमाणे दैदिप्यमान असणारे) हे आदर्श वाक्य असलेल्या हवाई दलामध्ये अग्नीवीर योजनेत ३५०० जागा भरण्यात येणार आहेत. अग्नीवीर योजना घोषणेपासूनच वादात सापडली असून बिहार व उत्तर प्रदेशासह देशाच्या काही राज्यांत या योजनेच्या विरोधात तरूणांचे आंदोलन सुरू आहे.

बिहारमध्ये आंदोलकांनी रेल्वे गाड्यांची जाळपोळ सुरू केल्याने आजही रोज किमान सव्वाशेहून जास्त गाड्या रोज रद्द कराव्या लागत आहेत. मात्र प्रचंड विरोध होऊनही मोदी सरकार ही योजना अंमलात आणण्यावर ठाम आहे. योजनेची घोषणा १४ जून रोजी झाली. त्यानंतर दहा दिवसांतच सर्वप्रथम हवाई दलाने २४ जूनपासून यासाठी अर्ज मागविण्यास सुरवात केली. यासाठी १७ वर्षे ५ वर्षे ते २३ वर्षांपेक्षा कमी अशी वयोमर्यादा असेल. म्हणजेच २९ डिसेंबर १९९९ ते २९ जून २००५ या दरम्यान जन्म झालेले तरूण यासाठी अर्ज करू शकतात. विज्ञान शाखेच्या उमेदवारांसाठी गणित, भौतिकशास्त्र व इंग्रजीसह १२ वी परीक्षेत किमान ५० टक्के गुण मिळाले पाहिजेत.

हवाई दलातर्फे आज देण्यात आलेल्या माहितीनुसार हवाई दलाकडे अग्नीवीरांच्या भरतीसाठी रविवारपर्यंत ५६,९६०, सोमवारपर्यंत ९४,२८१ अर्ज दाखल झाले होते. आज हवाई दलाने केलेल्या ट्विटनुसार नोंदणीकरण संकेतस्थळावर आजअखेर २ लाख ०१ हजार युवकांनी अर्ज केले आहेत.

# आलियानंतर कतरिनाकडून आता 'गुड न्यूज', लग्नानंतर...

बॉलिवूडसाठी 2022 हे वर्षे खूप खास आहे. या वर्षात बॉलिवूडमधील अनेक अभिनेत्री आणि अभिनेते लग्नबंधनात अडकले, कतरिना कैफ आणि विकी कौशल यांच्या लग्नानंतर अनेक स्टार्सनी लग्न केले. यात मौनी रॉय- सूरज नांबियार, करिश्मा- वरूण बंगिरा आणि मोस्ट अवेटेड कपल आलिया भट्ट – रणबीर कपूरचे या कपल्सचे नाव घेतले जाते. दरम्यान बॉलिवूडमधील या लग्नाच्या चर्चा थांबत नाही तोवर आता गुड न्यूजच्या चर्चा सुरु झाल्या आहेत, नुकतंच आलिया भट्ट आणि रणबीर कपूर यांनी आपण आई-बाबा होणार अशी गुडन्यूज दिली. या गुडन्यूजनंतर दोघांवर शुभेच्छांचा वर्षाव सुरु आहेत.

आलियाने आता आई होणार असल्याची बातमी देताच कतरिनाने देखील आपल्या चाहत्यांना गुडन्यूज दिली आहे. लग्नानंतर पहिल्यांदाच कतरिनाने ही गुडन्यूज दिली आहे. त्यामुळे चाहते देखील उत्साहित झाले आहेत. मात्र ही गुड न्यूज आई होण्याची नाही तर एका चित्रपटाची आहे, मात्र ही गोड बातमी आई होण्याची नसली तर चाहते फार आनंदात आहेत. कारण कतरिनाने लग्नानंतर पहिल्यांदाच तिच्या पहिल्या चित्रपटाची घोषणा केली आहे.


फोन भूत असे या चित्रपटाचे नाव असून तो लवकरचम प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. कतरिना कैफने एका सोशल मीडिया पोस्टद्वारे तिच्या आगामी फोन भूत या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे, 'फोन भूतच्या जगात तुमचं स्वागत आहे,' असं कॅप्शन अभिनेत्रीने चित्रपटाचे टिझर शेअर केलं आहे. कतरिनाचा हा चित्रपट 7 ऑक्टोबर 2022 रोजी रिलीज होणार आहे.



कतरिनाने चित्रपटाचा २२ सेकंदाचा टिझर शेअर केला आहे. मात्र या टीझरवरून चित्रपटाच्या स्टोरीचा अंदाज बांधणे अवघड आहे. कतरिना तिच्या चाहत्यांना घाबरवण्यासाठी भूत बनून येत असल्याच या टिझरवरुन समोर येत आहे. यामुळे कतरिना स्त्री भूताच्या भूमिकेत दिसणार असल्याचा अंदाज चाहत्यांकडून बांधला जात आहे.

# दीपिका आणि रणवीर आता फक्त भारतातीलच नाही तर आशियातील पॉवर कपल्सपैकी एक

चीनमधील साउथ चायना मॉर्निंग पोस्टने २०२२ मधीस आशिया खंडातील पॉवर कपल्सची यादी तयार केली, बॉलिवूडचं सुपर कपल रणवीर आणि दीपिकाच्या जोडीचे करोडो चाहते आहेत. दोघेही सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात सक्रिय असतात. वारंवार सोशल मीडियावर ते फोटो आणि व्हिडिओ शेअर करत असतात. अशातच यांच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी अशी की हे सुपर कपल आता फक्त बॉलिवूडच्या पॉवर कपल पैकी मर्यादीत नसून आता संपूर्ण आशियातील पॉवर कपल पैकी एक झाले आहे. नुकत्याच काही दिवसांपूर्वी आशिया खंडातल्या पॉवर कपल्सच्या यादीमध्ये बॉलिवूडच्या जोडप्यांना सुद्धा स्थान देण्यात आले. तसेच ही यादी चीनमधील साउथ चायना मॉर्निंग पोस्टने २०२२ मधील आशिया खंडातील पॉवर कपल्सची यादी तयार केली, ज्यात दीपिका आणि रणवीरचे नाव चौथ्या क्रमांकावर आले आहे. तसेच आशियातील पॉवर कपल्समध्ये हाँगकाँगचा अभिनेता टोनी लेउंग आणि करीना ल्यू यांचे नाव पहिल्या क्रमांकावर आले असून दक्षिण कोरियातील अभिनेता रेन आणि किम ताए हे दुसऱ्या क्रमांकावर, तर सिंगापूरचे फॅन वोंग आणि क्रिस्टोफर हे तिसऱ्या क्रमांकावर आहेत. याशिवाय आपल्या भारतातील लोकप्रिय पॉवर कपल दीपिका आणि रणवीर चौथ्या क्रमांकावर आहे. यापूर्वी दीपिका आणि रणवीर व्यतीरिक्त बॉलिवूडची कोणतीही जोडीने या यादीत स्थान मिळवले नव्हते.



# कतरिना कैफचा 'फोन भूत' चित्रपट लवकरच होणार प्रदर्शित




बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ सध्या तिच्या हॉरर-कॉमेडी चित्रपट 'फोन भूत'मुळे चर्चेत आहे. 'फोन भूत' चित्रपटाआधी कार्तिक आर्यन आणि कियारा अडवाणीच्या 'भूल भुलैया 2' चित्रपट सुद्धा याचं पद्धतीचा हॉरर-कॉमेडी चित्रपट होता. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर कोट्यावधींची कमाई केली होती. आता कतरिना कैफचा 'फोम भूत' चित्रपटाबाबत निर्मात्यांना अनेक अपेक्षा आहेत. दरम्यान या चित्रपटाबाबत एक नवीन बातमी समोर आली आहे. तसेच आता प्रेक्षक हा चित्रपट पाहण्यासाठी खूप उत्सुक झाले आहेत.

कतरिना कैफ , सिद्धांत चतुर्वेदी आणि ईशान खट्टर यांचा 'फोन भूत' हा हॉरर-कॉमेडी चित्रपट सध्या सोशल मीडियावरही खूप चर्चेत आहे. चाहते या चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेची आतुरतेने वाट पाहत आहेत. नुकतीच या चित्रपटाच्या रिलीज डेटची घोषणा करण्यात आली आहे. यासंदर्भात चित्रपटाचे पोस्टर शेअर करत या चित्रपटाचे निर्माते फरहान अख्तर यांनी माहिती दिली आहे. ही पोस्ट शेअर करत फरहान अख्तरने कॅप्शनमध्ये लिहिलंय की, 'फोन भूतच्या जगामध्ये तुमचे स्वागत आहे, होणार आहे.

# शेरशाह' नंतर सिद्धार्थ मल्होत्रा आणि कियारा अडवाणी झळकणार 'या' सिनेमात





'शेरशाह' चित्रपटात अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा आणि अभिनेत्री कियारा अडवाणीची केमिस्ट्रीने प्रेक्षकांना अक्षरशः भुरळ पाडली होती. या चित्रपटातील गाण्यांचे ही मोठ्या प्रमाणात कौतुक केले जात होते, याशिवाय या चित्रपटासाठी या जोडीने अनेक पुरस्कारही पटकावले आहेत. या चित्रपटानंतर कियारा आणि सिद्धार्थचे नाव सतत चाहत्यांच्या ओठांवर असते. दरम्यान आता ही जोडी पुन्हा एकदा एका नव्या चित्रपटात एकत्र काम करताना दिसणार असल्याचे म्हटले जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, सिद्धार्थ आणि कियारा सध्या एका रोमॅंटिक चित्रपटासाठी बोलणी करत आहेत. तसेच या चित्रपटामध्ये दोघे रोमांस करताना दिसू शकतात. सूत्रांच्या मते, सिद्धार्थ आणि कियाराला या चित्रपटाची स्क्रिप्ट आवडली होती, मात्र दोघांनीही अद्याप स्वाक्षरी केलेली नाही. सिद्धार्थ आणि कियाराने या चित्रपटात एकत्र काम करण्याचा विचार केला तर ही जोडी पुन्हा एकत्र पाहायला मिळेल. सिद्धार्थ आणि कियाराचा व्हिडिओ झाला होता व्हायरल मागील काही दिवसांपूर्वी सिद्धार्थ आणि कियाराला बांद्रामधील एका घरामध्ये जाताना स्पॉट करण्यात आलं होतं. त्यानंतर या दोघांमध्ये सर्व काही ठिक असल्याचे म्हटले जात होते.

# मल्लिका शेरावतचा RK/RKAY 'या' दिवशी होणार प्रदर्शित!

प्रियांशी फिल्म्स (प्रियाम श्रीवास्तव आणि हर्षिता करकरे) निर्मित या चित्रपटात मल्लिका शेरावत, कुब्रा सैत, रणवीर शौरी, मनु ऋषी चढ्ढा, चंद्रचूर राय, अभिजित देशपांडे, अभिषेक शर्मा, ग्रेस गिरधर आणि वैशाली मल्हारा यांच्या प्रमुख भूमिका आहेत

'RK/RKAY' ही एका चिंताग्रस्त दिग्दर्शकाची (आरके) कथा आहे ज्याने त्याच्या नवीन चित्रपटाचे शूटिंग पूर्ण केले आहे, परंतु एडिटिंग टेबलवर गोष्टी मनासारख्या होत नाहीयेत. आरकेच्या मनात काहीतरी गडबड होण्याची आशंका आहे. आणि त्याचे सर्वात वाईट स्वप्न प्रत्यक्षात उतरते जेव्हा तिला एडिट रूममधून त्रासदायक कॉल येतो, चित्रपटाचा नायक चित्रपटाच्या कथानकाचा ताबा घेवून प्रोजेक्टमधून बाहेर पडला आहे. मेहबूबचा चित्रपट संपला आहे- आरके आणि त्याच्या टीमने त्याला शोधून चित्रपटात परत पाठवायला पाहिजे आहे.

चित्रपटाबद्दल बोलताना रजत कपूर म्हणतात, "RK/RKAY ची कल्पना माझ्या मनात जवळपास गेली 10 वर्षे होती. हळुहळू तिचे सध्याचे स्वरूप सापडत गेले. हा एक मॅड चित्रपट आहे.. आणि मी याला मॅड सर्वार्थाने म्हणतो आहे.



## शॉर्ट न्यूज »

### टी २० विश्वचषकानंतर भारतीय संघ करणार न्यूझीलंड दौरा



मुंबई । महाईन्यूज

ऑस्ट्रेलियातील टी २० विश्वचषकानंतर भारतीय संघ तीन टी २० आणि तीन वनडे (ODI) सामन्यांच्या मालिकेसाठी न्यूझीलंडचा दौरा करणार आहे. न्यूझीलंड क्रिकेट मंडळाने (न्यूझीलंड क्रिकेट) आपल्या अधिकृत ट्वीटर अकाउंटवर याबाबत माहिती दिली आहे. आयपीएलनंतर भारतीय संघ दौरे करत असून मायदेशात मालिका खेळत आहे. एकामागोमाग एक मालिका असल्यामुळे भारतीय संघाचे दोन गट करण्यात आले आहेत. त्यानुसार, एक गट दक्षिण आफ्रिकेसोबत खेळला तर, दुसरा गट इंग्लंडसोबत खेळणार आहे. नुकताच भारतीय संघ आयरलँडसोबत खेळत आहे. त्यानंतर आता भारतीय संघ न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.

# फलंदाजांच्या क्रमवारीत विराट कोहलीला टाकले मागे!

## बाबर आझमने मोडीत काढला विक्रम

। बंगळूरु ।
महाईन्यूज ।



आयसीसीच्या टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत पाकिस्तानच्या बाबर आझमने अव्वल स्थानवर सर्वाधिक काळ राहण्याचा विक्रम केला आहे. भारतीय संघाचा माजी कर्णधार विराट कोहली याला मागे टाकत त्याने हा विक्रम रचला आहे. विराट कोहली हा १ हजार १३ दिवस अव्वल स्थानवर होता. मात्र त्याचा हाच विक्रम आता बाबर आझमने मोडीत काढला आहे. बाबर आझमनंतर भारताच्या इशान किशान या फलंदाजालाही या क्रमवारीत मोठा फटका बसला आहे. इशान किशान दोन क्रमांकानी खाली घसरला आहे. तसेच, या दोन जागांवर दीपक हुड्डा आणि संजू सॅमसनयांनी धेप घेतली आहे. नुकताच भारत आणि आयर्लंड यांच्यात टी-२० मालिका झाली. या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात सॅमसन आणि हुड्डा यांनी दमदार खेळी केली. सॅमसन याने ७७ धावा केल्या होत्या. तर हुड्डा याने १०४ धावा करत शतकी खेळी केली होती. त्यामुळे याच खेळीच्या जोरावर या दोघांनी इशान किशानला दोन क्रमांकांनी मागे टाकले. इशान किशनने आयर्लंड विरूद्धच्या दोन टी-२० सामन्यातील पहिल्या सामन्यात २६ आणि दुसऱ्या सामन्यात ३ धावा केल्या होत्या. त्यामुळे तो टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत सातव्या स्थानावर घसला आहे. शतकी खेळी करणारा दीपक हुड्डा याने पहिल्या सामन्यातही ४७ धावांची खेळी केली होती. त्याने ४१४ व्या स्थानावरून १०४ स्थानापर्यंत उसळी घेतली आहे. तर ऋतुराज गायकवाड दुखापतग्रस्त झाल्याने दुसऱ्या सामन्यात ७७ धावांची खेळी केली होती. तो आता आयसीसी टी-२० बॅटिंग रँकिंगमध्ये १४४ व्या स्थानावर पोहचला आहे. आयर्लंडचा आक्रमक फलंदाज हॅरी टेक्टरने देखील भारताविरूद्धच्या टी-२० मालिकेत चांगली कामगिरी केल्यामुळे रँकिंगमध्ये ५५ स्थानांची उसळी घेतली.

तो आता आयसीसी टी-२० बॅटिंग रँकिंगमध्ये ६६ व्या स्थानावर पोहचला आहे. त्याने पहिल्या सामन्यात ३९ आणि दुसऱ्या सामन्यात ६४ धावांची खेळी केली होती.

# इंग्लंडचा कर्णधार इऑन मॉर्गन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त

। क्वॉलालंपूर ।
महाईन्यूज ।



इंग्लंडचा विश्वविजेता कर्णधार इऑन मॉर्गनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. मागील काही दिवसांपासून सतत होणाऱ्या खराब खेळीमुळे मॉर्गनने हा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. मॉर्गनने वयाच्या ३५ व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती (EOIN MORGAN RETIREMENT) घेतली आहे. आयसीसीने ट्वीट करत इऑन मॉर्गनच्या निवृत्तीची माहिती दिली आहे. २०१९ साली इंग्लंडचा कर्णधार इयॉन मॉर्गनने (EOIN MORGAN) न्यूझीलंड संघाला अंतिम सामन्यात मात देत विश्वचषक जिंकला होता. तसेच, २००६ साली आंतरराष्ट्रीय सामन्यांत पदार्पण करणाऱ्या मॉर्गनने १६ वर्षानंतर निवृत्ती स्वीकारली आहे. आधी २००६ ते २००९ आयर्लंडसाठी क्रिकेट खेळलेल्या मॉर्गनने पुढील सर्व वर्षे इंग्लंडसाठी क्रिकेट खेळला.

इंग्लंडकडून इऑन मॉर्गनने २२५ वनडे सामन्यात १३ शतकांसह ६ हजार ९५७ धावा केल्या आहेत. तसेच, आयर्लंड आणि इंग्लंडकडून मिळून ७ हजार ७०१ धावा केल्या आहेत. यामध्ये १४ शतकांचा समावेश आहे. इऑन मॉर्गनने १२६ सामन्यात इंग्लंडचे नेतृत्त्व करत ७६ सामने संघाला जिंकवून दिले आहेत. सततच्या खराब खेळीमुळे यंदाच्या आयपीएल लिलावात मॉर्गन याला कोणीही बोली लावली नव्हती. तसेच, नेदरलँड्स विरुद्धच्या वनडे मालिकेतील पहिल्या दोन सामन्यांमध्ये तो शून्य धावांवर बाद झाला होता. त्यानंतर दुखापतीमुळे तिसऱ्या वनडे सामन्याला तो खेळू शकला नाही. २०१५ च्या विश्वचषकात इंग्लंडच्या निराशाजनक कामगिरीनंतर ॲलिस्टर कुकच्या जागी मॉर्गनची वनडे संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली होती. इयॉन मॉर्गनने आपल्या कर्णधारपदाखाली इंग्लंड क्रिकेट संघाचे नशीब बदलले.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही